ePaper

## आता मुख्यमंत्री डॉ. एकनाथ शिंदे म्हणायचं... डी. लीट पदवी प्रदान



| वर्ष - 6 | अंक - 339 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज(TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार , दि. 29 मार्च 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत

- स्वच्छ भारत : पंतप्रधान मोदींचा आग्रह!
- गुटखा बंदीचा बोजवारा !
- राष्ट्रवादी-काँग्रेसला दणका
- अमृतपाल सिंहवरील कारवाईवरून खलिस्तानी समर्थकांचा गोंधळ

# 'एक्सप्रेस वे'वर टोलधाड!



## 18 टक्क्यांनी दरवाढ : प्रवाशी, वाहनचालकांत नाराजी

**।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. परंतु येत्या 1 एप्रिलापासून या प्रवाशांना जास्त दर देऊन प्रवास करावा लागणार आहे. कारण आता मुंबई पुणे एक्सप्रेस वे च्या टोल दरात वाढ करण्यात आली आहे.**

2004 ला हा टोल सुरू करताना दर तीन वर्षांनी 18% दरवाढ करण्याचे ठरले होते. त्यानुसार आता टोलच्या दरात 18 टक्के वाढ एप्रिल 2023 पासून करण्याचा निर्णय प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. त्यामुळे या महामार्गावरुन जातात आता वाढीव टोल देऊन प्रवास करावा लागणार आहे.

या दरवाढीबाबत वाहन धारकांनी नाराजी व्यक्त केली हे. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मुंबई पुणे एक्सप्रेस वे मार्गाच्या टोल मध्ये दर तीन वर्षांनी 18 टक्के वाढ करण्याची अधिसूचना काढण्यात आली होती. त्यानुसार एप्रिल 2023 मध्ये टोलच्या दरात वाढ करण्याचा निर्णय टोल प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. 2004 ला हा टोल सुरू करताना दर तीन वर्षांनी 18% दरवाढ करण्याचे ठरले होते. मात्र यामागचं गृहीतक होतं की या रस्त्यावरील ट्रॅफिक दरवर्षी 5% ने वाढेल. 2004 ते 2019 या काळात या हिशोबाने कंत्राटदाराला 2869 कोटी रुपये मिळणार असे गृहीत धरून कंत्राट केले गेले. परंतु त्यापेक्षा जास्त निधी कंत्राटदाराला मिळाला. नवीन कंत्राट 2020 मध्ये झाले होते. त्यावेळी या सर्व बाबी विचारात घेऊन कंत्राट करणे आवश्यक होते. परंतु कंत्राट दहा वर्षांचे केले असल्याने आता त्यात बदल करणे शक्य नाही, असे सांगून शासन आणि प्रशासनाकडून दरवाढीचे समर्थन केले गेले.

## 1 एप्रिलपासून किती वाढले दर?

| वाहन | सध्याचे दर | नवीन दर |
|---|---|---|
| चार चाकी वाहन | 270 | 320 |
| टेम्पो | 430 | 495 |
| ट्रक | 430 | 495 |
| बस | 580 | 685 |
| थ्री एक्सल वाहन | 1380 | 1630 |
| एम एक्सल वाहन | 1835 | 2165 |

मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर 18 टक्के टोल दरवाढ ही अत्यंत चुकीची आणि अन्यायकारक आहे, असे वाहन धारकांकडून म्हटले जात आहे.

# स्वच्छ भारत : पंतप्रधान मोदींचा आग्रह!

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : भारतातील जनतेचा मोदींना प्रतिसाद

।पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशातील १३७ कोटी लोकसंख्या असणाऱ्या देशाच्या पंतप्रधाला स्वच्छतेबाबत आवाहन करावे लागणे हे अनेकांना आश्चर्य वाटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेसाठी देशभरातील स्वच्छतेबाबत जनतेकडे आग्रह धरला होता. २०१४ पूर्वी रस्त्यावर, सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसायचे. मात्र मोदीजी यांच्या आवाहनानंतर जनतेनेही उत्तम प्रतिसाद दिला असल्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे.**



"स्वच्छतेचा नमो करंडक" या बहुचर्चीत स्पर्धेचा आज शानदार बक्षीस वितरण सोहळा चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी भाजप शहर सरचिटणीसराजेश पांडे, संत गाडगे महाराजांचे वंशज योगेश जाणोरकर, गायक सलील कुलकर्णी, माजी नगरसेविका मंजुश्री खर्डेकर, माधुरी सहस्त्रबुद्धे, माजी नगरसेवक दीपक पोटे, भाजप नेते पुनीत जोशी, जुन्नर शहर भाजपा शहराध्यक्ष सचिन खत्री, भाजप प्रवक्ते संदीप खर्डेकर, विनायक आंबेकर, सिनेट सदस्य प्रसेनजीत फडणवीस यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना पाटील म्हणाले, कोरोनाच्या काळामध्ये घरामध्ये असतानाही भीती वाटायची. परंतु स्वच्छता कर्मचारी रस्त्यावर उतरून आपले कर्तव्य बजावत होते, आपण त्यांचे ऋण व्यक्त करायला हवेत. समाजाला आवश्यक असणारे नवनवीन कार्यक्रम राबवायला हवेत. समाजाची आवश्यकता लक्षात घेवून ज्यावेळी आपण कार्यक्रम आखतो त्यावेळी समाजाचा त्याला पाठिंबा मिळतो. लोकांच्या उत्साह देखील या स्पर्धेत चांगला दिसून आला. गिरीश खत्री आणि त्यांच्या टीमचे याबद्दल अभिनंदन आहे. त्यांनी असेच उपक्रम येणाऱ्या काळामध्ये देखील राबवावेत अशा शुभेच्छा पाटील यांनी यावेळी दिल्या.

### स्वच्छतेचा संदेश तळागाळापर्यंत पोहचवण्याचा उद्देश : गिरीश खत्री

'आयोजक गिरीश खत्री म्हणाले,.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून एक स्वच्छतेचा संदेश दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशापुढे स्वच्छतेसाठी नवीन आदर्श निर्माण केला आहे. त्यांचा हा संदेश आम्ही पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहोत. त्यामुळे गेल्या वर्षीपासून स्वच्छतेचा नमो करंडक ही स्पर्धा सुरू केली. या स्पर्धेत गेल्यावर्षी ४२ तर यावर्षी तब्बल ९० सोसायट्यांनी सहभाग नोंदवला. या माध्यमातून जवळपास १२ हजार घरे आणि २५ हजार लोकांपर्यंत आम्ही पोहचलो. भाजपचे कार्यकर्ते आज पुणे शहरात वेगवेगळ्या भागामध्ये असे कार्यक्रम घेत आहेत. पुणे शहराला अभिमान वाटेल असा कार्यक्रम आम्ही नक्कीच भविष्यात करणार आहोत आज आपण पाहतोय की या स्वच्छ भारत अभियानाने चळवळीचे स्वरूप धारण केले आहे. एका जनआंदोलनाच्या स्वरुपात हे सर्व सुरु आहे. स्वच्छतेचा संदेश तळागाळापर्यंत पोहचवणे हा या अभियानाचा उद्देश आहे आणि तोच उपक्रम किंवा त्याच माध्यमातून हे काम आम्ही पुढे नेत आहोत. इतर उत्सवाप्रमाणे स्वच्छता हाही एक उत्सव व्हावा या उद्देशाने हि स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.असं ते म्हणाले.

### विजेते

**गट 0-10 वर्षे**

प्रथम -पराग सहकारी सोसायटी
द्वितीय - अनंत रुक्मणी को ऑप हाउसिंग सोसायटी
तृतीय - अलंकापुरीश्री को ऑप हाउसिंग सोसायटी
उत्तेजनार्थ - K52 को ऑप हाउसिंग सोसायटी

**गट 11 ते 20 वर्ष**

प्रथम - अनमोल हाईट
द्वितीय - रत्नदीप हाउसिंग सोसायटी
तृतीय - प्राची हाउसिंग सोसायटी
उत्तेजनार्थ - भूषण अपार्टमेंट

21 ते 30 वर्ष

प्रथम - मिनल गार्डन को ऑप हाउसिंग सोसायटी
द्वितीय - प्रज्ञानंद अपार्टमेंट
तृतीय - कुलकर्णी कॉम्प्लेक्स
उत्तेजनार्थ - साकेत अपार्टमेंट

**गट - 31 ते 60 वर्षे**

प्रथम - सौरभ को ऑफ हाउसिंग सोसायटी
द्वितीय - यशश्री सदन
तृतीय - यजुर्वेद सहकारी गृहरचना
उत्तेजनार्थ - देवदत्तकृपा हाऊसिंग सोसायटी

**गट - बंगलो सोसायटी**

प्रथम - स्वस्तिश्री ऑप हाउसिंग सोसायटी
द्वितीय - शैलेश ऑप हाउसिंग सोसायटी
तृतीय - मनमोहन ऑप हाउसिंग सोसापटी

**उत्तेजनार्थ -**

श्रीयश को ऑप हाउसिंग सोसायटी

गट - मोठ्या सोसायटी

प्रथम - राहुल टॉवर्स को ऑप हाउसिंग सोसायटी
द्वितीय - व्हायोला को ऑप हाउसिंग सोसायटी
तृतीय -काकडे सिटी बिल्डिंग को ऑप हाउसिंग सोसायटी लिमिटेड
उत्तेजनार्थ - अवनीश अपार्टमेंट
स्वच्छता श्री - हिमाली रेसिडेन्सियत को और हाउसिंग सोसायटी लिमिटेड
स्वच्छता लक्ष्मी - युनायटेड वेस्टर्न को ऑप हाउसिंग सोसायटी
स्वच्छता वसुंधरा - संकुल को ऑप हा.सो.

# थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम वेगात

## मार्चमध्ये 22 हजारांहून अधिक वीजजोडण्या खंडित

।पुणे। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पुणे परिमंडलातील ५ लाख ११ हजार ६१४ घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे अद्यापही १०२ कोटी २६ लाख रुपयांची थकबाकी असून ती त्वरित भरण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. तर, वारंवार आवाहन करूनही थकीत वीजबिलांचा भरणा केला नसल्याने मार्च महिन्यात आतापर्यंत २२ हजार ८१६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. दरम्यान, वीजग्राहकांना चालू आणि थकीत वीजबिलांचा भरणा करणे सोयीचे व्हावे यासाठी पुणे परिमंडलातील महावितरणचे सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र गुरुवारी (३० मार्च) सार्वजनिक सुटीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सुरू राहणार आहेत. सोबतच लघुदाब वीजग्राहकांना बिलांचा घरबसल्या ऑनलाईन भरणा करण्यासाठी महावितरणच्या WWW.MAHADISCOM.IN संकेतस्थळ आणि मोबाईल ॲपद्वारे सोय उपलब्ध आहे.

महावितरणची संपूर्ण आर्थिक मदार ग्राहकांकडील वीजबिलांच्या दरमहा वसूलीवरच आहे. वीजबिलांच्या वसूलीमधूनच वीजखरेदीसह विविध देणी दरमहा द्यावी लागतात. त्यामुळे थकीत वीजबिलांच्या वसूलीला मोठा वेग देण्यात आला आहे. गेल्या २७ दिवसांमध्ये पुणे शहरातील १६ हजार ८० थकबाकीदारांचा, पिंपरी चिंचवडमधील ३ हजार ६१६ थकबाकीदारांचा तर, ग्रामीण भागात ३ हजार १२० ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. वीजग्राहकांनी थकबाकीचा त्वरीत भरणा करावा व वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.



# गुटखा बंदीचा बोजवारा!

## बेकायदा विक्रीचा उच्चांक : पोलीस प्रशासनासमोर आव्हान

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

राज्यात गुटखा विक्रीला बंदी असतानाही पिंपरी-चिंचवड शहरात ठिकठिकाणी टपऱ्यांवर गुटखा उपलब्ध होत असून, त्याचा साठा व विक्रीही मोठ्या प्रमाणात होत असल्याचे मागील काही दिवसांत झालेल्या कारवाईवरून समोर येत आहे. विक्रीचे प्रमाण पाहता शहर गुटख्याचे आगार बनत असल्याचे दिसून येत आहे. गुटखा पुरविणाऱ्यांच्या मुळापर्यंत जाऊन सर्व रॅकेट उद्ध्वस्त करणे गरजेचे आहे.



वास्तविक, गुटखा विक्रीला सर्वत्र बंदी असल्याने टपऱ्यांवर व दुकानांवर खुलेआम विक्री होत नसली तरी छुप्या पद्धतीने विक्री सुरूच आहे. पोलिसांकडूनही दुर्लक्ष केले जात असल्याने गुटखा विक्री करणारेही बिनधास्त सुटले आहेत. दरम्यान, मागील आठवडाभरात पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेच्या युनिट दोन, तीन तसेच दरोडा विरोधी पथक व खंडणी विरोधी पथकासह हिंजवडी पोलिसांकडून कारवाई झाली. लाखो रुपयांचा मुद्देमालही जप्त केला. अमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई केली. त्यामुळे जानेवारी महिन्यात एकूण ११ लाख ३ हजार ५९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, फेब्रुवारी महिन्यात १८ हजार ५५१ आणि मार्च महिन्यात ४४ लाख ९२ हजार ८३९ केल्याचे आकडेवारीवरुन स्पष्ट झाले आहे.



**सुमारे ५०० कोटी रुपयांची उलाढाल...**

काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या काळात महाराष्ट्रात गुटखा बंदी करण्यात आली. गुटखाबंदी झाल्यानंतर सुरुवातीला काही काळ गुटखा उत्पादक धास्तावले होते. मात्र, गुटखा उत्पादक, विक्रेत्यांनी समांतर व्यवस्था उभी करून बेकायदा गुटखाविक्रीचे जाळे निर्माण केले. परराज्यातील गुजरात आणि कर्नाटक भागातून पुण्यात गुटखा विक्रीसाठी पाठविला जातो. हप्तेखोरी, पोखरलेल्या यंत्रणेमुळे गुटखा विक्री राजरोस सुरू असून एकट्या पुणे शहर परिसरात बेकायदा गुटखा विक्रीतून पाचशे कोटींची उलाढाल दरमहा होत असल्याची माहिती पुढे आली आहे.

### हप्तेखोरीमुळे यंत्रणा पोखरलेली?

गुटखा बंदीचा आदेश नावापुरता आहे. जुजबी कारवाई करून गुटखा विक्रेते आणि उत्पादकांमध्ये दहशत निर्माण करायची आणि त्या बदल्यात गुटखा उत्पादकांकडून हप्ते घ्यायचे. पोलीस तसेच अन्न व औषध विभागातील काहींच्या छुप्या पाठिंब्यावर पुणे, मुंबई तसेच राज्यभरात गुटखा विक्रीचे जाळे निर्माण करण्यात आले आहेत. हप्तेखोरीमुळे संपूर्ण यंत्रणा पोखरली असून गुटखा बंदी कागदावर असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

> शहरात काही दिवसांपूर्वीच गुटखा पुरविण्याच्या मुळापर्यंत जाऊन चाकण येथे मोठी कारवाई केली होती. आताही कारवाया सुरूच आहेत. मागील काही दिवसात जो गुटखा पकडला आहे. त्यांच्या मुळापर्यंत जात त्याचा साठा व विक्री करणाऱ्यांसह गुटखा पुरविणाऱ्यांपर्यंत जाऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.
>
> **- सतीश पवार,** वरिष्ठ पोलिस निरीक्षक, अमली पदार्थ विरोधी पथक, पिंपरी-चिंचवड.

# मराठी भाषेला लवकरच अभिजात दर्जा!

## खासदार श्रीरंग बारणे यांचा विश्वास : केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांची भेट

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

महाराष्ट्रातीलच नव्हे, तर जगभरातील मराठी माणसांच्या अस्मितेचा प्रश्न असल्याने मराठी भाषेला तात्काळ अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी आग्रही मागणी शिवसेनेच्या शिष्टमंडळाने केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्याकडे केली. त्यावर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत सांस्कृतिक विभाग सकारात्मक आहे. लवकरच त्याबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन मंत्री मेघवाल यांनी दिले. त्यामुळे मराठी भाषेला लवकरच अभिजात भाषेचा दर्जा मिळेल, असा विश्वास खासदार बारणे यांनी व्यक्त केला.



शिवसेनेचे संसदीय नेते गजानन कीर्तीकर, लोकसभेतील गटनेते राहुल शेवाळे, मावळचे खासदार श्रीरंग बारणे, खासदार कृपाल तुमाणे यांनी केंद्रीय सांस्कृतिक राज्यमंत्री अर्जुन रामपाल मेघवाल यांची मंगळवारी भेट घेतली. यासंदर्भात खासदार बारणे यांनी लोकसभेत दोन वेळा प्रश्न उपस्थित केला होता.

याबाबतची माहिती देताना खासदार बारणे म्हणाले, मराठी भाषा ही राज्यातील जनतेच्या जिव्हाळ्याचा, सर्वसामान्य माणसांच्या अस्मितेचा प्रश्न असल्याने मराठी भाषेला लवकरात-लवकर अभिजात भाषेचा दर्जा देण्याची विनंती केली. मराठी भाषेस गौरवशाली व ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. अनेक वर्षांपासूनचे मराठी भाषांचे शिलालेख, कोनशिला, ताम्रलेख, पुरातन साहित्य, वस्तू देखील भारतीय पुरातत्व विभागाकडे उपलब्ध आहेत.

### लवकरच निर्णय घेणार : मेघवाल

भारतातील अधिकृत 22 भाषांपैकी मराठी एक भाषा आहे. मराठी भाषा देवनागिरी लिपीत लिहिलेली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे 2013 पासून पत्रव्यवहार केला जात आहे. याबाबतचा प्रस्तावही राज्य सरकारने 8 डिसेंबर 2016 रोजी केंद्र सरकारकडे पाठविला आहे. त्याबाबतची फाईल मंत्रालयात तयार आहे. त्यामुळे याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी विनंती केली. त्यावर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी सांस्कृतिक विभाग सकारात्मक आहे. याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री मेघवाल यांनी दिले.

महाराष्ट्रातील मुख्य भाषा मराठी आहे. भारतातील भाषांपैकी मराठी भाषा एक प्रमुख भाषा आहे. महाराष्ट्र, गोव्याची अधिकृत भाषा मराठी आहे. मातृभाषेच्या संख्येच्या बाबतीत मराठी जगात पंधराव्या तर भारतात चौथ्या क्रमांकावर आहे.

मराठी भाषा बोलणा-यांची लोकसंख्या सुमारे 9 कोटी आहे. इ.स.वी सन 900 पासून ही भाषा प्रचलित आहे. हिंदीच्या समान संस्कृतवर आधारित मराठी भाषा आहे. भारतात प्रामुख्याने महाराष्ट्रात मराठी भाषा बोलली जाते. याशिवाय गोवा, कर्नाटक, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, तामिळनाडू आणि छत्तीसगडमध्ये मराठी भाषा बोलली जाते. केंद्रशासित प्रदेशांमध्ये दमन-दीव, दादरा आणि नगर हवेलीमध्येही मराठी भाषा बोलली जाते.

## संपादकीय »

# वाढवण बंदरासाठी केंद्राचा हेका!

***भाजपला कसंही करून वाढवण बंदर उभारायचेच आहे. वाढवण बंदराला गावकऱ्यांचा तीव्र विरोध असतानाही केंद्र सरकारने गेल्याच आठवड्यात डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण समितीमधील चार सदस्यांना तडकाफडकी हटवलं आहे.***

समितीवरून दूर करण्यात आलेल्या सदस्यांनी पर्यावरण आणि प्रकल्पाच्या दुष्परिणामांबद्दल सरकारी अहवालावर आक्षेप नोंदवले होते. वाढवण बंदरासंदर्भात सुनावणी प्रक्रिया सुरू असतानाच समितीमध्ये बदल करण्यात आला. केंद्र सरकारने त्यासाठी १९९६ च्या डहाणू अधिसूचनेत बदल केला आहे. या पार्श्वभूमीवर चार सदस्यांना डच्चू दिल्याने केंद्र सरकारच्या भूमिकेवर संशय व्यक्त होऊ लागला आहे. त्यातूनच आता वाढवण बंदरविरोधक पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून नियुक्त करण्यात आलेल्या डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण समितीमधील (डीटीईपीए) चार सदस्यांना केंद्र सरकारने तडकाफडकी हटवले आहे. वाढवण बंदर पर्यावरण तसेच प्रकल्पाच्या दुष्परिणामांबाबत सरकारी अहवालांच्या सत्यतेबाबत या सदस्यांनी आक्षेप नोंदवले होते. प्रकल्पाच्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिणामांबाबत 'डीटीईपीए' समोर सुनावणी सुरू आहे. मुंबईत १३ फेब्रुवारी रोजी झालेल्या बैठकीत 'डीटीईपीए'ने आपली भूमिका प्रकर्षाने मांडली होती. त्यानंतर २८ मार्चला समितीकडून प्रकल्प स्थळाची तपासणी करण्याचे निश्चित करण्यात आले होते. असे असतानाच ९ मार्चला अचानक केंद्र सरकारने १९९६ च्या अधिसूचनेत बदल केला. त्याद्वारे वाढवण बंदराला विरोध करणाऱ्या सदस्यांचे समितीतील स्थान संपुष्टात आले आहे. यात मुंबई आयआयटीचे श्याम आसोलेकर, राज्याच्या नगरविकास विभागाचे माजी नगररचनाकार विद्याधर देशपांडे आणि अहमदाबादमधील सीईटीपी विद्यापीठाचे के. बी. जैन यांच्यासह अन्य एका सदस्याचा समावेश आहे. वाढवण बंदराला होणारा विरोध डावलून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी स्थानिकांच्या हिताची भूमिका घेणाऱ्या तज्ज्ञांना हटवण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. चारही सदस्य जुने आणि डहाणूच्या पर्यावरणाची इत्थंभूत माहिती असलेले आहेत, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. केंद्राकडून ही समिती बरखास्त करण्याचा प्रयत्न यापूर्वीही करण्यात आला होता. या समितीची गरज नसून समितीवर वर्षाला ५० लाख रुपयांचा खर्च होत आहे. डहाणूच्या पर्यावरण रक्षणासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ राष्ट्रीय हरित लवाद सक्षम आहे, असेही केंद्राकडून सांगण्यात येत होते



## आनंदी सकाळ

# या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात होते प्रगती...

आपला देह हा पंचभूतात्मक आहे, म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश ही तत्त्वरूपाने असतात. वाहणारा वायू हा जडस्वरूप वायू आहे; मात्र तत्त्वरूपातील वायू किंवा पाणी हे यापेक्षा वेगळे आहे. मन हे वायू तत्त्वापासून, बुद्धी हे तेज, चित्त आकाश, तर अहंकार हा पृथ्वी तत्त्वापासून म्हणजे जडतत्त्वापासून बनला आहे. यातील मन चंचल आहे. ते भटकते. हा त्याचा दोष; पण जेथे दोष असतात, तेथे काही गुणही असतात. जसे चिकटणे हा हिंगाचा दोष असला, तरी तो योग्य पद्धतीने सेवन केल्यास तो जठररोग दुरुस्त करतो; तसेच चंचलता हा मनाचा दोष असला, तरी परमार्थाच्या दृष्टीने तोही उपयुक्त आहे. मन स्थिर असते, तर जीवनात घडलेली एखादी दु:खद घटना आपण मरेपर्यंत विसरलो नसतो. मन चंचल असल्यामुळे आपण जुने विसरून नव्या उभारीने जीवन सुरू करतो. ही नवी उभारी या चंचल मनामुळे येते, म्हणून चंचलता हा दोष व गुण असे दोन्ही आहे. या चंचल मनाला आवर घातल्यावर परमार्थात प्रगती होते.

# महत्त्व श्रीरामाष्टमीचे...






प्रभू श्रीरामांच्या ठायी असलेले विविध गुण अंगी बाणवून आदर्श व्यक्तीमत्त्व घडवण्याचा प्रत्येकाचा कल असतो. रामनवमीच्या (ता.३०) उत्सवाला चैत्र प्रतिपदेपासून प्रारंभ होतो. श्रीरामांच्या जन्माआधीच्या अष्टमीचे महत्त्व हे त्यांच्या महतीमधून समजून घेतल्यास त्यांच्या व्यक्तीमत्त्वातील विविध गुणांचा अधिक चांगल्या प्रकारे परिचय होऊ शकतो. रामरायाचे चरित्र शतकोटी श्लोकांइतके उदंड विस्तार पावलेले आहे. त्यातील एकेक अक्षरसुद्धा मनुष्यांच्या महापातकांचा नाश करणारे आहे. रामरक्षेचा हा पहिलाच श्लोक आश्वासन देतो की, तुमचं मन पूर्वी केलेल्या कर्मांच्या संस्काराने वाईट झालेले असले तरी ते रामनामानें शुद्ध आणि पवित्र होईल. रामाचे गुण, त्यांनी आचरलेला मार्ग, दाखवलेले मर्यादापूर्ण जीवन, स्नेहपूर्ण अलिप्तता, स्थिरता, प्रेमस्वरूप आणि ज्ञानस्वरूप आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. असे श्रीराम समोर असले की मनात वाईट विचार येतच नाहीत. रावणाला रामाचे रूप घेऊन सीतेचे हरण करणे सोपे होते; पण रावण म्हणतो मी जर रामरूप घेतले तर माझे विचारच बदलतील, मी रामासारखाच होईन.

क्षुद्र विचारच येणार नाहीत. शतकोटिश्लोकांचं रामचरित्र आम्हाला सांगा असे म्हणून देव, दानव आणि मानव श्रीशंकरांकडे हट्ट धरून बसले. श्रीशंकरांनी तीन समान वाटण्या केल्या. प्रत्येकाला तेहतीस कोटी तेहतीस लाख तेहतीस हजार तीनशे तेहतीस श्लोक आले आणि एक श्लोक उरला. त्याचीही वाटणी. श्लोक अनुष्टप छंदातील अक्षरे ३२. मग समान दहा-दहा दिली. दोन अक्षरे राहिली 'राम,' ती शंकरांनी आपल्या कंठात धारण केली. 'राम' ही दोनच अक्षरे मानवाचा उद्धार करायला पुरेशी आहेत. रामकथा श्रवण करा, रामनाम घ्या. चित्त सदैव पवित्र राहील. महापातकनाशनम् असे रामनाम मुखाने म्हणा. या श्लोकात सीता लक्ष्मणासह रामाचे ध्यान सांगितले आहे. नीलकमळाप्रमाणे श्यामल कांती असणारा राम, राजीवलोचन अर्थात कमळदळाप्रमाणे सुंदर लोचन असणारा राम, सीता व लक्ष्मणासह असणारा राम हवा.

दुर्जनांचा परिहार, सज्जनांचे रक्षण

राम वाल्मिकी ऋषींना म्हणाले- मी येथे अरण्यात कोठे राहू. राम हा सर्वव्यापी आहे, तो प्रत्यक्ष ईश्वर आहे. तो नाही अशी जागाच नाही. मग तू कोठे राहावे हे कसे सांगता येईल? राम म्हणाले सीता व लक्ष्मणासहित कोठे राहू? रामा, सीता व लक्ष्मणासह तू भक्तांच्या हृदयात राहा. सीता हे भक्तीचं प्रतिक तर लक्ष्मण हे संयमाच आणि वैराग्याचं प्रतिक. रामाचं ध्यान हे सीता व लक्ष्मणासह म्हणजेच भक्ती, संयम आणि वैराग्य. जटेच्या व मुकुटाने सुशोभित श्रीरामाचे मुकुट हे राज्यवैभवाचे प्रतिक तर जटा या वैराग्याचे प्रतिक.

# कर्ज घ्या, पण या गोष्टी लक्षात ठेवा!

**आधुनिक टेक्नॉलॉजीमुळे बँका किंवा फायनान्स कंपन्या कमी व्याजदराची आणि काही मिनिटांत लोनची रक्कम तुमच्या खात्यात जमा करण्याची ऑफर ठेवतात. फक्त आपण कर्ज हवंय एवढं म्हणायचं. इतकी तत्पर सेवा आपल्याला ह्या बँका आणि फायनान्स कंपन्या देतात. मग तुमचं आर्थिक ध्येय कितीही मोठे असू द्या. त्याची पूर्तता तुम्हाला सहज करता येईल.**

सध्याच्या टेक्नॉलॉजीच्या ह्या फास्ट युगात प्रत्येक माणसाकडे त्याची आर्थिक उद्दिष्ट, ध्येय पूर्ण करण्यासाठी पुरेसा पैसा आहे असं आपल्याला वाटतं. अगदी लक्ष देऊन पैशांचा योग्य वापर केला ना तर आपल्या सगळ्या आर्थिक गरजा पूर्ण होऊ शकतील. फक्त थोडं आर्थिक बाबतीत सज्ञान होणं गरजेचं आहे. म्हणजेच हातात आलेला पैसा कसा आणि किती खर्च करायचा आणि आपल्या चांगल्या भविष्यासाठी शिल्लक राहिलेला पैसा कसा आणि कुठं गुंतवायचा एवढं समजून घेतलं तर फायनान्शिअल प्रॉब्लेम्स तुमच्यासमोर उभे राहणार नाहीत. काही माणसांची स्वप्नं मोठी असतात, तशीच खरी आर्थिक उद्दिष्टेसुद्धा मोठी असतात. त्यांच्यात धाडस असतं, काहीतरी मोठं करण्याची जिद्द असते आणि त्यांची



इच्छाशक्तीसुद्धा जबरदस्त असते. मग ही मोठी स्वप्नं किंवा मोठी उद्दिष्टे गाठायला जास्त पैशांची गरज लागते. अशा मोठ्या गरजा भागवायला सध्या आपल्यासमोर बरेच पर्याय आहेत.

सगळ्याच बँका तुम्हाला मदत करायला तयार आहेत. असंख्य फायनान्स कंपन्या तुमच्यासमोर अनेक प्रकारचे नवीन नवीन पर्याय घेऊन येत आहेत. पूर्वी लोन मिळवायचं म्हणजे फारच कठीण काम होतं, पण आता सगळ्या बँका, फायनान्स कंपन्या तुम्हाला कर्ज द्यायला तयार आहेत. नुसत्या तयारच नाहीत तर तुम्ही फक्त ई-मेल करायचा की लगेच तुम्हाला बँकांचे फोन येतात आणि अगदी कमी वेळात तुमच्या कर्जाला होकार देण्याची त्यांची तयारी असते. टेक्नॉलॉजीमुळे ह्या बँका किंवा फायनान्स कंपन्या काही मिनिटांतच तुमच्या कर्जाची रक्कम तुमच्या खात्यात जमासुद्धा करतात. तुमच्यापुढे कमी व्याजदराची आणि काही मिनिटांत लोनची रक्कम तुमच्या खात्यात जमा करण्याची ऑफरसुद्धा ठेवतात.

फक्त आपण कर्ज हवंय एवढं म्हणायचं. इतकी तत्पर सेवा आपल्याला ह्या बँका आणि फायनान्स कंपन्या देतात. मग तुमचं आर्थिक ध्येय कितीही मोठे असू द्या. त्याची पूर्तता तुम्हाला सहज करता येईल. कर्ज घेणं इतकं सोपं झालंय. कर्ज

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।  
या मज सोडवा लवकरी ॥१॥  
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।  
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादी-काँग्रेसला दणका!

## सरपंच, माजी नगरसेवकांसह शेकडो पदाधिकारी शिंदे गटात

।मुंबई। महाईन्यूज ।

**राज्यातील सत्तातरानंतर जिल्ह्याचे खासदार, आमदार उद्धव ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ राहिले होते. तर काहींनी शिंदे गट आणि भाजपला नेते मंत्री फोडाफोडीत फारस यश मिळालं नव्हतं. परंतु सत्तांतरानंतर अनेक नेते पदाधिकारी मात्र आता पक्षांतर करताना दिसत आहेत. अशातच महाविकास आघाडीतले घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी व काँग्रेसला मात्र शिंदे गटाने मोठा दणका दिल्याचा दावा केला जात आहे.**







परभणीतील तब्बल १०१ सरपंच, ३४ माजी नगरसेवकांसह शेकडो पदाधिकाऱ्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या नंदनवन या निवासस्थानी काल रात्री हा प्रवेश सोहळा संपन्न झाला. शिंदे गटाने राष्ट्रवादीसोबतच काँग्रेसला दणका दिल्याची चर्चा या निमित्ताने राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

परभणीतील शिवसेना युवानेते सईद खान यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत या सर्वांना भगवा झेंडा हातात घेत शिवसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादी, काँग्रेससह विविध पक्षातील १०१ ग्रामपंचायतीचे सरपंच , ३४ माजी नगरसेवक, शेकडो महिला- पुरुष पदाधिकाऱ्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. यामध्ये जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद, पंचायत समिती सभापती, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्यकारणीचे सदस्य जलील पटेल यांचा देखील समावेश आहे. परभणी जिल्ह्यातुन आतापर्यंत २०१ सरपंच, ६४ नगरसेवकानीं शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्याचा दावा केला जात आहे.

### उद्याही कार्यकर्ताच असेन: मुख्यमंत्री शिंदे

**»परभणीतील शिवसेना युवानेते सईद खान यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत या सर्वांना भगवा झेंडा हातात घेत शिवसेनेत प्रवेश केला. राष्ट्रवादी, काँग्रेससह विविध पक्षातील १०१ ग्रामपंचायतीचे सरपंच, ३४ माजी नगरसेवक, शेकडो महिला- पुरुष पदाधिकाऱ्यांनी शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.**

# डॉ. एकनाथ शिंदे! मुख्यमंत्र्यांना मिळाली डॉक्टरेट पदवी!!

## राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते शिंदे यांना पदवी बहाल

।मुंबई महाईन्यूज ।

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज डी.लिट ही पदवी देण्यात आली आहे. याबद्दल मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहे. डी. वाय. पाटील विद्यापीठाकडून ही पदवी त्यांना देण्यात आली आहे. आपला मुलगा जिथे शिकला, त्याच विद्यापीठाकडून डी.लिट पदवी मिळणं गौरवाची गोष्ट असल्याचंही शिंदे यांनी म्हटलं आहे..**



कधी विचार केला नव्हता पण विचार न करता बरंच काही मिळत गेलं. अशी पदवी मिळेल, असं मला वाटलं नव्हतं. डी. लिटसारखी प्रसिद्ध पदवी मला देण्याचं ठरवलं, यासाठी मी या विद्यापीठाचा आभारी आहे. मला डी वाय पाटील विद्यापीठाकडून ही पदवी मिळाल्याचा आनंद आहे, अशा भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या आहेत. राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते शिंदे यांना ही पदवी बहाल करण्यात आली आहे. वैज्ञानिक रघुनाथ माशेलकर, आप्पासाहेब धर्माधिकारी, सिंधूताई सपकाळ अशा दिग्गज लोकांना या विद्यापीठाने पदवी दिली आहे. त्यानंतर आता त्यांनी मला हा सन्मान दिला, त्याबद्दल मी विद्यापीठाचा ऋणी आहे, असंही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले आहे. सामाजिक, आरोग्य आणि आपत्कालीन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांना डॉक्टरेट पदवी मिळाली आहे. यावेळी आपल्या भाषणात शिंदे म्हणाले,"हे काम करणं लोकप्रतिनिधी म्हणून माझी जबाबदारी आहे. या जबाबदारीचा वापर सर्वसामान्य माणूस अडचणीत असताना करायचा असतो." "आपण घरात बसायचं नसतं ही शिकवण मला बाळासाहेबांनी आणि धर्मवीर आनंद दिघे यांनी दिली, कोरोनातही आम्ही काम केलं, जबाबदारीचं पालन केलं. २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण हे बाळासाहेबांचं सूत्र आम्ही पुढे नेलं. मी मुख्यमंत्री झालो तरी मी कालही कार्यकर्ता होतो, आजही आहे आणि उद्याही कार्यकर्ताच असेन", असंही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

### उद्याही कार्यकर्ताच असेन: मुख्यमंत्री शिंदे

**» "आपण घरात बसायचं नसतं ही शिकवण मला बाळासाहेबांनी आणि धर्मवीर आनंद दिघे यांनी दिली, कोरोनातही आम्ही काम केलं, जबाबदारीचं पालन केलं. २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण हे बाळासाहेबांचं सूत्र आम्ही पुढे नेलं. मी मुख्यमंत्री झालो तरी मी कालही कार्यकर्ता होतो, आजही आहे आणि उद्याही कार्यकर्ताच असेन", असंही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.**

# सावरकर अवमानप्रकरणी राहुल गांधींनी माफी मागावी

।मुंबई ।महाईन्यूज ।



कर्नाटक विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मतांसाठी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमान काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. त्यामुळे त्यांनी सावरकरांची, देशाची आणि महाराष्ट्राची जाहीर माफी मागावी, अशी मागणी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी येथे केली. सावरकर यांच्याविषयी माहिती न घेता, त्यांच्या योगदानाचा अभ्यास न करता त्यांचा जाणीवपूर्वक अपमान करणाऱ्या राहुल गांधी यांनी सावरकर अंदमानातील ज्या कोठडीत होते त्या कोठडीत राहून दाखवावे; आम्ही त्यांचा नागरी सत्कार करू, असे आवाहनही सामंत यांनी केले.

लोकसभा सदस्यत्व रद्द झाल्यानंतर राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना वीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले. त्यांच्या या विधानावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला आहे. तर शिवसेना-भाजपाने राज्यात सावरकर गौरव यात्रा काढण्याची घोषणा केली आहे. सावरकरांच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असताना शिवसेनेने काल, सोमवारी काँग्रेसने बोलावलेल्या बैठकीकडे पाठ फिरवली. मात्र, या बैठकीत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी सावरकरांचे विविध क्षेत्रातील योगदान लक्षात घेता त्यांना माफीवीर म्हणून संबोधणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले. त्यावर राहुल गांधी यांनी, माझ्या टीकेने कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी टीका करणार नाही, अशी भूमिका मांडल्याची चर्चा आहे. या चर्चेचा आधार घेत उदय सामंत यांनी आज, मंगळवारी पत्रकार परिषदेत बोलताना, राहुल गांधी यांनी यापुढे सावरकरांबद्दल बोलणार नाही, असे चार भिंतीच्या आत बोलण्यापेक्षा जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली. यावेळी सामंत यांनी उद्धव ठाकरे गटावरही टीका केली. भारत जोडो यात्रेत राहुल गांधी यांनी सावरकर यांचा अपमान केला. त्यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते मूग गिळून गप्प होते. या पक्षाचे नेते यात्रेत सहभागी झाले होते. राहुल गांधींची भारत जोडो यात्रा ही राजकीय होती.

# अमृतपाल सिंहवरील कारवाईवरून खलिस्तानी समर्थकांचा गोंधळ!

## चार देशांमध्ये निदर्शनं; अमेरिकन दूतावासात तोडफोड

।कर्नाटक । महाईन्यूज ।

खलिस्तान समर्थक अमृतपाल सिंहच्या अटकेसाठी पंजाब पोलिसांकडून धडक कारवाई सुरु आहे. अमृतपाल सिंहच्या साथीदारांना पोलिसांनी अटक केली आहे. खलिस्तानी समर्थक अमृतपाल सिंहवर झालेल्या कारवाईमुळे जगातील चार देशांमध्ये त्याचे समर्थक निदर्शनं करताना दिसत आहेत. खलिस्तानी समर्थकांनी सोमवारी (20 मार्च) सॅन फ्रान्सिस्कोमधील भारतीय दूतावासाची तोडफोड केली. या संदर्भात भारतात तीव्र निषेध व्यक्त केला आहे.

**ब्रिटननंतर अमेरिकन दूतावासाची तोडफोड**

ब्रिटननंतर अमेरिकेतील सॅन फ्रान्सिस्को येथील भारतीय दूतावासात खलिस्तान समर्थकांनी गोंधळ घातला आहे. डझनभर समर्थकांनी लाठ्या, काठ्या, तलवारींनी हल्ला केला आणि भिंतीवर 'FREEAMRITPAL' असे पोस्टर झळकावत भारताविरोधी घोषणाबाजी केली. खलिस्तानी समर्थकांनी भारतीय दूतावासाच्या कार्यालयावर हल्ला करून तोडफोड केली. समर्थकांनी दुतावासाच्या इमारतीवर खलिस्तानी झेंडाही फडकावला. जमावाने लाठ्या-काठ्यांनी हल्ला करत दूतावासाच्या प्रवेशद्वाराचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न केला.



भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाची यूएस प्रभारी एलिझाबेथ जोन्स यांच्याशी भेट झाली. या भेटीदरम्यान, परराष्ट्र मंत्रालयाने अमेरिकन सरकारला भारतीय उच्च युक्तालयातील अधिकाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करण्याची आठवण करून दिली आणि अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सांगितलं आहे.

### भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने काय म्हटलं?

**» भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं सांगितलं की, या पार्श्वभूमीवर वॉशिंग्टनमधील भारतीय दूतावासाने अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाकडे चिंता व्यक्त करत सुरक्षा सुनिश्चित करण्यास सांगितलं आहे.**

### अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयानं काय म्हटलं?

» भारताने निषेधा नोंदवल्यानंतर, यूएस स्टेट डिपार्टमेंटच्या प्रवक्त्यानं सांगितलं की, अमेरिकेतील भारतीय दूतावासावरील हल्ल्याचा निषेध करतो. ते म्हणाले, आम्ही भारतातील नेते आणि अधिकाऱ्यांना खात्री देऊ इच्छितो की आम्ही भारतीय दूतावासातील अधिकाऱ्यांच्या सुरक्षेची पूर्णपणे काळजी घेण्यासाठी वचनबद्ध आहोत.

# "डोकं अदाणींचं अन् पैसा मोदींचा"

## अरविंद केजरीवालांचा पंतप्रधानांवर गंभीर आरोप

। लंडन।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अदाणी प्रकरणावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. जनता जीएसटी भरते आणि ते पैसे पंतप्रधान मोदींजवळ जातात. काँग्रेसने ७५ वर्षात जेवढं लुटलं नाही, तेवढं यांनी ( भाजपा ) ७ वर्षात लुटलं. डोकं अदाणींचं आणि पैसा पंतप्रधान मोदींचा असतो, असा हल्लाबोल केजरीवाल यांनी विधानसभेत बोलताना केला आहे.



"जेव्हा अदाणी जगातील सर्वात श्रीमंत दुसरे व्यक्ती बनले. तेव्हा, पंतप्रधान मोदी जगातील सर्वात श्रीमंत दुसरे व्यक्ती बनले होते. आता ते जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बनू इच्छित आहेत. तसेच, अदाणी समूहात सर्व पैसा पंतप्रधान मोदी यांचा आहे," असा गौप्यस्फोट केजरीवाल यांनी केला आहे."पंतप्रधान मोदी यांनी श्रीलंकेचे राष्ट्रपती राजपक्षे यांची भेट घेत अदाणी समूहाला पवन उर्जाचा प्रकल्प मिळवून दिला. हा प्रकल्प अदाणी नाहीतर स्वत:साठी घेतला आहे. आपल्याकडं संसदीय समिती असते, तसेच श्रीलंकेतील एका समितीने वीज बोर्डाच्या अध्यक्षाला बोलवत विचारलं, हा प्रकल्प अदाणी समूहाला का दिला?, त्यावर अध्यक्षाने सांगितलं की, हा प्रकल्प अदाणी समूहाला देण्यासाठी पंतप्रधान मोदींचा राजपक्षे यांच्यावर खूप दबाव आहे," असं केजरीवाल यांनी म्हटलं."तपास यंत्रणेच्या माध्यमातून चौकशा करत दुसऱ्यांच्या कंपन्यांवर ताबा घेण्यात येत आहे. पहिल्यांदा कृष्णापट्टनम येथील बंदरावर धाड टाकण्यात आली. काही वर्षानंतर ते अडाणींनी विकत घेतलं. तसेच, एसीसी आणि अंबुजा सिमेंट कंपन्यांवरही छापे टाकण्यात आले. नंतर ते अदाणींनी विकत घेतलं," असेही केजरीवाल यांनी सांगितलं.

### केजरीवाल यांनी केला गौप्यस्फोट

**» "जेव्हा अदाणी जगातील सर्वात श्रीमंत दुसरे व्यक्ती बनले. तेव्हा, पंतप्रधान मोदी जगातील सर्वात श्रीमंत दुसरे व्यक्ती बनले होते. आता ते जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बनू इच्छित आहेत. तसेच, अदाणी समूहात सर्व पैसा पंतप्रधान मोदी यांचा आहे," असा गौप्यस्फोट केजरीवाल यांनी केला आहे.**



# उत्तर मेक्सिकोमधील स्थलांतरितांच्या केंद्राला आग

## 40 जणांचा मृत्यू तर 30 जखमी

। मेक्सिको।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

उत्तर मेक्सिकोमधील स्थलांतरितांच्या केंद्राला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत ४० जणांचा मृत्यू झाला असून ३० जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना काल सोमवारी रात्री मेक्सिकोतील सिउदाद जुआरेझ या शहरात घडली. येथील स्थलांतरितांच्या केंद्राला आग लागल्यामुळे ४० जणांचा मृत्यू झाला आहे. परंतु या घटनेत मृत्यूच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, केंद्रातील आग विझवण्यासाठी रुग्णवाहिका, अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. मदत आणि बचावकार्याला येथे सुरुवात झाली आहे. तसेच जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

संयुक्त राज्य अमेरिकेत जाणाऱ्या प्रवाशांसाठी सिउदाद जुआरेझ हे एक प्रमुख क्रॉसिंग पॉइंट आहे. येथील केंद्रात आश्रय किंवा स्थलांतरित लोकांना त्यांच्या विनंतीवर निर्णय होईपर्यंत ठेवतात. ज्या केंद्राला आग लागल्याची घटना समोर आली आहे. ते केंद्र सुद्धा अशाच पद्धतीचे होते. दरम्यान, या दुर्घटनेचा तपास मेक्सिकोच्या ॲटर्नी जनरल कार्यालयाने सुरू केला आहे.



# दीपा परबचा ग्लॅमरस अंदाज

अभिनेत्री दीपा परबने जवळपास 14 वर्षानंतर पुन्हा एकदा 'तू चाल पुढं' या मालिकेच्या माध्यमातून मराठीत कमबॅक केलं. या मालिकेची गोष्ट आहे एका गृहिणीने पाहिलेल्या मोठ्या स्वप्नांची. एकत्र कुटुंब असलेल्या या घरी अश्विनीलादेखील त्यांच्या नवीन घरासाठी आणि कुटुंबासाठी खारीचा वाटा उचलण्याची इच्छा आहे. ही मालिका प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेणारी ठरत आहे. ही मालिका आता एका रोमांचक वळणावर आली आहे. मालिकेत आता 'मिसेस इंडिया 2023 ग्रॅन्ड फिनाले' लवकरच प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

### अश्विनीचा ग्लॅमरस अंदाज

मराठी मालिकेत प्रथमच इतक्या ग्रँड पद्धतीने ही स्पर्धा पार पडत आहे. या ग्रँड फिनालेचं परीक्षण इशा कोप्पीकर करणार आहे. प्रेक्षकांना आपलीशी वाटणाऱ्या अश्विनीचा ग्लॅमरस प्रवास सुरु झाला आणि मालिकेतील अश्विनीच्या भूमिकेला प्रेक्षकांनी उचलून धरलं. या स्पर्धेदरम्यान तिला अनेक अडथळ्यांमधून जावं लागलं. पण अखेरीस अश्विनीने या स्पर्धेत पुन्हा कमबॅक केलं. अश्विनीची ही भूमिका सर्वसमावेशक आहे. कुटुंबातील सदस्य, त्यांचे स्वभाव, तिचं घराप्रती कर्तव्य या सर्व गोष्टींची सांगड घालून समंजसपणे घरातील नाती सांभाळून घेणाऱ्या अश्विनीचा मिसेस इंडिया 2023 ग्रॅन्ड फिनालेचा प्रवास सुरू झाला आहे. अश्विनीलाने मोठा पल्ला गाठला असला तरी शिल्पी तिच्या या प्रवासात अडथळे आणणार आहे. त्यामुळे मालिका आता खरोखरचं रोमांचक वळवणार येऊन पोहोचली आहे. आपल्या मातृभाषेत आपल्या मनातलं बोलण्याची परवानगी अश्विनीला मिळेल का याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

दीपा परबने जवळपास 14 वर्षानंतर पुन्हा एकदा 'तू चाल पुढं' या मालिकेच्या माध्यमातून मराठीत कमबॅक केलं आहे. दीपाने मधल्या काळात अनेक हिंदी मालिकांमध्ये काम केलं. पण, बऱ्याच वर्षांनी दीपा आता मराठी टेलिव्हिजनवर प्रेक्षकांच्या भेटीस आली आहे. 'तू चाल पुढं' या मालिकेत दीपा परब प्रमुख भूमिकेत दिसत आहे. दीपा ही अभिनेता अंकुश चौधरीची पत्नी आहे.

# शोमध्ये माधुरी दीक्षितबाबत आक्षेपार्ह भाषेचा वापर केल्याचा आरोप नेटफ्लिक्सला नोटीस



बिग बँग थिअरी (BIG BANG THEORY) या प्रसिद्ध शोमधील एका एपिसोडमध्ये माधुरी दीक्षितबाबत आक्षेपार्ह भाषेचा वापर केल्याचा आरोप राजकीय विश्लेषक मिथुन विजय कुमार यांनी केला आहे. या प्रकरणी मिथुन विजय कुमार यांनी नेटफ्लिक्सला (NETFLIX) नोटीस पाठवली आहे. ही नोटीस पाठवून मिथुन विजय कुमार यांनी स्ट्रिमिंग प्लॅटफॉर्मवरुन या शोमधील एक एपिसोड हटवण्याची मागणी केली आहे.

बिग बँग थिअरीच्या दुसऱ्या सिझनमधील पहिल्या एपिसोडमध्ये जिम पार्सन्स यानं शेल्डम कूपर ही भूमिका साकारली आहे. जिम पार्सन्स हा शोमध्ये माधुरी दीक्षित आणि ऐश्वर्या राय यांची तुलना करतो. त्यानंतर तो माधुरीबाबत एक कमेंट करतो. या कमेंटवर आता मिथुन विजय कुमार यांनी आक्षेप घेतला आहे. मिथुन विजय कुमार यांनी एक ट्वीट शेअर केलं आहे. या ट्वीटमध्ये त्यांनी लिहिलं, 'काही दिवसांपूर्वी मी नेटफ्लिक्सवरील बिग बँग थिअरी या शोचा एक एपिसोड पाहिला. यामधील एक अभिनेता दिग्गज बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्याबद्दल बोलताना आक्षेपार्ह आणि अपमानास्पद शब्द वापरतो.'

# घटस्फोटानंतर समांथा पुन्हा पडली पुन्हा प्रेमात?

साउथस्टार अभनेत्री समांथा रुथ प्रभू ही मागील काही काळापासून अनेक कारणाने चर्चेत असते. सध्या ती तिच्या आगामी 'शकुंतलम' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ती तिच्या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये कुठलीही कसर सोडतांना दिसत नाही आहे.

ती हैदराबाद आणि मुंबई या दोन्ही ठिकाणी चित्रपटाचे जोरदार प्रमोशन करताना दिसली आहे. ती चाहत्यांची लाडकी आहे. केवळ साउथच नाही तर तिची हवा जगभर आहे.



नुकतच समांथा तिच्या चाहत्याला ट्विटरवर दिलेल्या उत्तरामुळे चर्चेत आली आहे. त्याच झालं असं की, एका चाहत्याने समांथाला कोणालातरी डेट करण्याची विनंती केली. यावर समांथानं त्याला जे उत्तर दिलं त्यानं सर्वांची मनं जिंकली आहे. 26 मार्च रोजी एका चाहत्याने ट्विटद्वारे समांथाला विनंती करत ट्विट केलं की, 'ही त्याचा हक्क नाही, कृपया कोणाला तरी डेट कर.' समांथाही या चाहत्याच्या ट्विटला उत्तर देताना दिसली.

अभिनेत्रीने लिहिले, 'तुझ्यासारखं माझ्यावर कोण प्रेम करेल.' यासोबतच अभिनेत्रीने हार्ट इमोजी देखील शेअर केला आहे.

तिच्या या कृतीनं तिनं पुन्हा चाहत्यांची मनं जिंकली आहे. तिचं हे ट्विट सध्या व्हायरल झालं आहे. या ट्विटची सर्वत्र चर्चा सुरु आहे.

समांथा रुथ प्रभू ही 'शाकुंतलम' या चित्रपटात दिसणार आहे. हा एक पीरियड ड्रामा आहे . या चित्रपटाचे दिग्दर्शन गुणशेखर यांनी केले आहे. 'शंकुतलम' 14 एप्रिल 2023 रोजी

# देसी गर्लनं पुन्हा केली कमाल!



बॉलीवूडची देसी गर्ल अभिनेत्री प्रियांका चोप्रा हिने केवळ भारताच नव्हे तर जगभर तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने लोकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. तिने आता स्वत:ला केवळ भारतापुरताच मर्यादित ठेवलं नसून जागतिक स्तरावर तिची ख्याती पसरवली आहे.

प्रियांका चोप्रा नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. एकीकडे अभिनेत्री तिच्या आगामी 'सिटाडेल' या वेब सीरिजमुळे चर्चेत असतानाच आता तिने पुन्हा भारताची मान गर्वाने उंचावणारे काम केले आहे.

खरं तर, देसी गर्लने पुन्हा एकदा भारताचा अभिमान आणि सन्मान वाढवला आहे.

प्रियांका चोप्रा 'अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेस'च्या सदस्यांमध्ये सामील होणार आहे. अशी बातमी समोर आली आहे. प्रियांका ही केवळ तिच्या अप्रतिम अभिनय कौशल्यांसाठीच ओळखली जात नाही तर ती व्यावसायिक आणि लेखिका देखील आहे. त्याचबरोबर ती लोकांची मदतही करत असते. सर्वांमध्ये लोकप्रिय प्रियांका चोप्रा तिच्या करिअरसोबतच इतर अनेक गोष्टींद्वारे लोकांशी जोडली गेली आहे.

ती 'अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेस'ची सदस्य बनली आहे, ज्यासाठी तिला संस्थेच्या सदस्य मंडळाकडून आमंत्रण मिळाले आहे. 'अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेस'चे सदस्य होण्यासाठी त्याच्या आमंत्रणासोबतच ऑस्कर नामांकनही आवश्यक आहे.

विशेष म्हणजे प्रियांका चोप्राच्या 'व्हाइट टायगर' या चित्रपटालाही ऑस्करमध्ये नामांकन मिळाले होते. या चित्रपटात प्रियांकाने अभिनयासोबतच त्याची निर्मितीही केली होती. प्रियांका अकादमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सेसची सदस्य होणे ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे.

# माहोल आयपीएलचा!

## केकेआरचा नितीश कर्णधार

।चेन्नई, । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**बॉलिवूडचा किंग खान अर्थात शाहरुख खानचा मालकी हक्क असलेला कोलकाता नाईट रायडर्सने आयपीएलमध्ये आतापर्यंत दोनवेळा जेतेपद पटकावलं आहे. पण 2014 नंतर केकेआर संघाला म्हणावं तसं यश मिळालेलं नाही. गौतम गंभीरच्या नेतृत्वाखाली कोलकाता नाईट रायडर्सने 2012 आणि 2014 मध्ये अजिंक्यपद पटकावला होता. पण यानंतर एकाही कर्णधाराला अशी कामगिरी करता आलेली नाही. आता आयपीएलच्या नव्या हंगामात नव्या उत्साहासह केकेआर मैदानात उतरणार आहे. पण त्यांच्या या उत्साहाला स्पर्धेआधीच धक्का बसला आहे. केकेआरचा कर्णधार श्रेयस अय्यर दुखापतग्रस्त असून त्याच्या आयपीएलमध्ये खेळण्यावर प्रश्नचिन्ह आहे. अशात संघाचं नेतृत्व नितिश राणा याच्याकडे सोपविण्यात आले आहे.**

### श्रेयस अय्यरची कमी जाणवणार

धडाकेबाज फलंदाज श्रेयस अय्यरवर केकेआरने 2002 च्या लिलावात तब्बल 12 कोटी 25 लाख रुपये बोली लावून आपल्या संघात घेतलं. गेल्या हंगामात श्रेयस अय्यरने केकआरचं नेतृत्व केलं. श्रेयस अय्यर कर्णधार आणि प्रमुक फलंदाज आहे. पण यंदा खेळू शकणार नसल्याने श्रेयस अय्यरची कमी संघाला जाणवणार आहे. त्यामुळे प्लेईंग इलेव्हन निवडणं हे कोलकाता नाईट रायडर्ससमोरचं प्रमुख आव्हान असणार आहे.



### केकेआरची प्लेईंग इलेव्हन

» केकेआरच्या प्लेईंग इलेव्हनमध्ये लिट्टन दास आणि व्यंकटेश अय्यर यांच्यावर सलामीची जबाबदारी असण्याची शक्यता आहे. लिट्टन दासवर फलंदाजीबरोबर विकेटकीपर अशी दुहेरी जबाबदारी असणार आहे. तर व्यंकटेश अय्यर आक्रमक फलंदाजी करण्यासाठी ओळखला जातो. मधल्या फळीत नितीश राणा, रिंकू सिंह आणि मनदीप सिंह यांच्यावर जबाबदारी असणार आहे. त्यानंतर अष्टपैलू आंद्रे रसेल आणि सुनील नरिन संघाची जबाबदारी सांभाळतील. सुनील नरिन फलंदाजीबरोबरच अनुभीव फिरकी गोलंदाज आहे. त्याला फिरकी गोलंदाज वरुण चक्रवर्तीची साथ मिळेल. याशिवाय शार्दुल ठाकूर, उमेश यादव आणि टीम साऊदी यांच्यावर वेगवान गोलंदाजीची जबाबदारी असणार आहे. यातला शार्दुल ठाकूर हा तळाला येऊन उपयुक्त फलंदाजी करण्यातही माहिर आहे.

## धोनीची वाढतेय क्रेझ

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



इंडियन प्रीमियर लीगच्या 16व्या हंगामाला 31 मार्चपासून सुरुवात होणार आहे. स्पर्धेतील पहिल्या सामन्यात चार वेळचा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्जचा सामना गतविजेत्या गुजरात टायटन्सशी होणार आहे. सलामीच्या लढतीतच अनुभवी कर्णधार महेंद्रसिंग धोनीचा सामना युवा कर्णधार हार्दिक पांड्याशी होणार आहे. चेन्नईचा संघ आपल्या होम ग्राउंड एमए चिदंबरम स्टेडियमवर हंगामाची तयारी करत आहे. लीगमधील 10 संघांपैकी एक चेन्नई सुपर किंग्जचा चाहत्यांशी भावनिक बंध आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे कर्णधार महेंद्रसिंग धोनी. 41 वर्षीय धोनीने संघाला चार विजेतेपद आणि नऊ फायनलपर्यंत नेले आहे, त्याची केवळ उपस्थिती विरोधी कॅम्पला घाबरवण्यासाठी पुरेशी आहे. धोनीचा क्रिकेटपटू म्हणून हा त्याचा शेवटचा हंगाम असू शकतो आणि तो एक संस्मरणीय बनवण्यासाठी कोणतीही कसर सोडू इच्छित नाही,



## सात क्रिकेटपटूंवर बीसीसीआयची वक्रदृष्टी

### वार्षिक करारातून डच्चू

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय खेळाडूंच्या कामगिरीच्या आधारे बीसीसीआय दरवर्षी वार्षिक कराराची यादी जाहीर करते. बोर्डाने 26 मार्चला 2022-23 या वर्षासाठी वार्षिक कराराची यादी प्रसिद्ध केली. या यादीत अनेक बदल अपेक्षित होते आणि तेच झाले. अनेक खेळाडूंची चांदी झाली तर अनेकांना निराश व्हावे लागले. या यादीतून 7 खेळाडूंना वगळले आहे. आता त्यांच्या कारकिर्दीवर संकटाचे ढग निर्माण झाले आहेत.**

बीसीसीआयने यंदाच्या वार्षिक कराराची यादी जाहीर करताच. या यादीतून 7 भारतीय खेळाडू बाहेर होते. यामध्ये अनेक अनुभवी खेळाडू आहेत तर युवा खेळाडूंचाही या यादीत समावेश आहे.

अजिंक्य रहाणे, वेगवान गोलंदाज इशांत शर्मा, वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमार, यष्टिरक्षक फलंदाज रिद्धिमान साहा, फलंदाज हनुमा विहारी, सलामीवीर मयंक अग्रवाल आणि अष्टपैलू दीपक चहर यांचा समावेश नाही. बीसीसीआयने या खेळाडूंना यंदाच्या करार यादीतून वगळले आहे.

बोर्डाने सात खेळाडूंना यादीतून काढून टाकल्याने आता त्यांच्या कारकिर्दीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. या खेळाडूंनी बराच काळ संघासाठी एकही आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. अशा परिस्थितीत आता या खेळाडूंची कारकीर्द धोक्यात आली आहे. इशांत शर्मा, भुवनेश्वर कुमार, दीपक चहर आणि हनुमा विहारी दुखापतीमुळे संघाबाहेर आहेत. मात्र या खेळाडूंनी दीर्घकाळ संघासाठी एकही सामना खेळलेला नाही, तर साहाने आधीच सांगितले आहे की संघात संधी मिळणे खूप कठीण आहे. रहाणेलाही जानेवारी 2022 पासून संघात संधी देण्यात आलेली नाही.



### मयंकचे पुनरागमन शक्य

»संघामध्ये स्थान न मिळाल्याने मयंक अग्रवालने देशांतर्गत क्रिकेटमध्ये खूप धावा केल्या. मयंकने धमाकेदार कामगिरी करताना धावांचे तुफान आणले होते. त्याने 900 हून अधिक धावा केल्या होत्या आणि द्विशतकही केले होते. त्याची कामगिरी पाहता त्याला संघात परत आणले जाऊ शकते.

## तब्बल पाच वर्षांनी होणार आयपीएल रंगारंग उद्‌घाटन

### सोहळा, रश्मिका मंदान्नासह ‘या’ स्टार्सचा परफॉर्मन्स मिळणार पाहायला

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२३ अवघ्या काही दिवसांवर आहे. नवीन ब्लॉकबस्टर सीझन ३१ मार्चपासून सुरू होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गतविजेत्या गुजरात टायटन्सची लढत महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई सुपर किंग्जशी होणार आहे. चार वेळचा चॅम्पियन चेन्नई गेल्या मोसमात ९व्या क्रमांकावर होता. गुजरात आणि चेन्नई यांच्यातील सामना साडेसात वाजता सुरू होईल. या सामन्यापूर्वी उद्घाटन समारंभ आयोजित केला जाईल.

जवळपास तीन वर्षांनंतर आयपीएलमध्ये होम आणि अवे फॉरमॅटचे पुनरागमन होत आहे. आयपीएलचा थरार सुमारे ७४ दिवस चाहत्यांच्या डोक्यावर फिरणार आहे. आयपीएलचा पहिला सामना पाहण्यासाठी एक लाखाहून अधिक प्रेक्षक येणार असल्याचे मानले जात आहे.

